<u>कालमर्यादा /महत्वाचे</u>

क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१७/रापोनि/०८/२०१७
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- २३/०१/२०१७.

संदर्भ :- दिनांक १६/०२/२०१५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात शासनाने प्रसृत केलेला महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) अध्यादेश, २०१५.

विषय <u>:- सार्वत्रिक बदल्या-२०१७ करिता सुधारित माहिती पाठविण्याबाबत :-</u>
राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षक

...ooo---

<u>परिपत्रक:-</u>

राखीव पोलीस उपनिरीक्षक, व राखीव पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबत शासनाने संदर्भाधिन अध्यादेशानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित केले आहे :-

१) दि.३१/०५/२०१७ पर्यत, किंवा त्यापुर्वी ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक, व राखीव पोलीस निरीक्षक यांचा प्रचलित नियमांनुसार (महाराष्ट्र पोलीस सुधारणा अध्यादेश-२०१५) एके ठिकाणी ०३ वर्षांचा सामान्य पदावधी पूर्ण झाला असेल, त्या राखीव पोलीस उपनिरीक्षक, व राखीव पोलीस निरीक्षकांची माहिती त्यांच्या बदलीच्या विनंतीसह या कार्यालयास पाठवावी, जेणेकरुन, पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ च्या मान्यतेने त्यांच्या बदल्या करण्याबाबतची प्रशासकीय कार्यवाही करता येईल.

२) **<u>सर्वसाधारण बदल्या - २०१७ ह्या खालील ०३ प्रकारात मोडतात :</u>**

**अ) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी**

**आ) विहीत कालवधी पूर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज, व**

**इ) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस अधिकारी.**

**अ) <u>विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी :-</u>**

दिनांक ३१/०५/२०१७ पर्यंत, किंवा त्यापुर्वी ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांचा सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयात तीन वर्षांचा विहीत कालावधी पुर्ण झाला आहे, असे बदलीसपात्र पोलीस अधिकारी .

**आ) <u>विहीत कालवधी पुर्ण नाही, परंतु मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज :-</u>** ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षक यांनी सध्याच्या पदावर विहीत कालावधी पूर्ण केलेला नाही. परंतु, त्या

पदावरुन व ठिकाणावरुन इतर ठिकाणी बदली हवी असेल, अशा अधिकाऱ्यांची त्यांच्या विनंतीच्या ठिकाणासह, व अशी बदली का पाहिजे याच्या सबळ कारणासह संबंधीत घटक प्रमुखांच्या शिफारशींसह त्वरेने माहिती पाठवावी.

I. त्यांनी त्यांच्या बदलीसंदर्भात वारंवार विनंती अर्ज सादर न करता एकाच अर्जात त्यांची जी काही विनंतीची ठिकाणे असतील ती नमूद करुन सदरचा अर्ज संबंधीत घटक प्रमुखांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह ह्या कार्यालयास पाठवावेत.

II. राखीव पोलीस उपनिरीक्षक, व राखीव पोलीस निरीक्षकांनी या कार्यालयास सादर केलेल्या/ करण्यात येणाऱ्या विनंती अर्जांच्या आगाऊ प्रतींची संख्या ही असंख्य असल्याने अशाप्रकारे या कार्यालयास मोठया प्रमाणात प्राप्त होणाऱ्या प्रत्येक आगाऊ प्रतीवर या कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करणे प्रशासकीयदृष्टया शक्य होणार नाही. त्याचप्रमाणे, काही पोलीस अधिकारी अशा आगाऊ प्रतीचा संदर्भ, त्यांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढे सादर केलेल्या मूळ अर्जात प्रकरणात नमूद करुन सदर आगाऊ प्रतीवर/संदर्भावर या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत मा.न्यायाधिकरणामार्फत विचारणा करतात. त्यामुळे योग्य मार्फतीने प्राप्त झालेल्या संदर्भाव्यतिरिक्त आगाऊ प्रतींवर कार्यवाही करणे, अथवा त्याबाबतचे स्पष्टीकरण या कार्यालयाकडून देणे संयुक्तीक/शक्य होणार नाही.

III. तसेच, जर राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांना या कार्यालयात पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) व विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांना प्रत्यक्ष विनंती अर्ज सादर करणे अगदीच आवश्यक असल्यास अशा पोलीस अधिकाऱ्यांनी प्रथम त्यांच्या अर्जावर संबंधीत घटकप्रमुखांचे अभिप्राय घेणे आवश्यक असेल, आणि ते पोलीस दलाच्या शिस्तीस अनुसरुन आवश्यक आहे.

**दि. ०१/०२/२०१७ पुर्वी या कार्यालयात पाठविलेले सर्व प्रकारचे विनंती अर्ज/ प्रतिकूल अहवाल इत्यादि या परिपत्राकान्वये रद्द समजण्यात येत आहेत. त्यावर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही, याची सर्वानी नोंद घ्यावी, व ती बाब संबंधीत घटकप्रमुखांनी सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावी.**

**इ) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाचे पोलीस अधिकारी :-**

ज्या राखीव पोलीस उपनिरीक्षक व राखीव पोलीस निरीक्षकांची प्रतिकूल अहवालानुसार बदली करावयाची असल्यास संबंधीत घटकप्रमुखांनी या कार्यालयाचे क्र. पोमसं/१४-अ/६७/एमएम/१८७/ २०१६, दि. ०७/१०/२०१६ च्या परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींचे पालन करुन त्यानुसार संबंधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठवावा.

३) सर्वसाधारण बदल्या- २०१७ करिता खालीलप्रमाणे आराखडा निश्चित करण्यात आला आहे, त्याचे अनुपालन सर्वांनी करावे :

| कालावधी | करावयाची कार्यवाही |
|---|---|
| दिनांक ०१/०२/२०१७ ते २८/०२/२०१७ | पोलीस घटकांनी पोलीस अधिकाऱ्यांचे विनंती अर्ज प्राप्त करुन घ्यावेत. तसेच, विहीत कालावधी पूर्ण झालेल्या बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांची माहिती तयार करावी |
| दिनांक ०१/०३/२०१७ | सर्व माहिती पो.म.सं. कार्यालयास पाठविणे. |
| दिनांक ०१/०३/२०१७ ते १५/०३/२०१७ | पोलीस महासंचालक कार्यालयात बदलीपात्र पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंती अर्जांची तपासणी व कार्यवाही |
| दिनांक १६/०३/२०१७ ते २०/०३/२०१७ | पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ ची बैठक व आदेश |
| दिनांक २१/०३/२०१७ ते ३१/०३/२०१७ | बदली झालेल्या सर्व पोलीस अधिकाऱ्यांना रितसर कार्यभार हस्तांतर करुन त्यांना कार्यमुक्त करणे. |
| दिनांक ०१/०४/२०१७ ते ३०/०४/२०१७ | सर्व पोलीस अधिकाऱ्यांनी कर्तव्यांवर हजर होणे, व संबंधीत घटकांनी या कार्यालयास अनुपालन अहवाल पाठविणे. |
| दिनांक ३१/०५/२०१७ | कर्तव्यावर हजर न झालेल्या अधिकाऱ्यांना ज्ञापन देवून हजर न झाल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंबंधी कळविणे.<br>दिनांक ३१/०५/२०१७ नतंर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, पो.म.सं. कार्यालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून स्थिगिती आदेशंव्यतिरिक्त इतर सर्व अधिकाऱ्यांना स्थित कार्यमुक्त करुन दि. ०१/०६/२०१७ नंतर त्यांचे वेतन सध्याच्या घटकात काढण्यात येवू नये. |

**बदलीबाबत विनंती करण्यासाठी कोणीही पोलीस अधिकारी पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यास येणार नाही. बदली झाल्यानतंर जोपर्यत बदलीच्या ठिकाणी तेहजर होत नाहीत, तोपर्यंत त्यांच्या कोणत्याही विनंतीचा विचार करण्यात येणार नाही. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होऊनच विनंतीसाठी नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने, व त्यांच्या अभिप्रायांसह अर्ज सादर करावेत. नवीन घटकप्रमुखांच्या मार्फतीने सादर न केलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. बदली पुनर्विलोकनाबाबत नंतर कळविण्यात येईल.**

४) महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २(६A) नुसार पोलीस अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या या दरवर्षी एप्रिल महिन्यात करणे आवश्यक आहे. त्यामुळे अशाप्रकारे वर नमूद केल्याप्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांच्याकडून त्या कालावधीत करणे सुलभ होण्याच्या दृष्टीकोनातून, सर्व संबंधीत घटक पोलीस प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे १) विहित कालावधी पूर्ण झालेले पोलीस अधिकारी, २) मुदतपूर्व बदलीसाठी सादर केलेले विनंती अर्ज तसेच, ३) प्रतिकूल अहवालावरुन बदली करावयाच्या पोलीस अधिकाऱ्यांची माहिती स्वतंत्रपणे सोबत जोडलेल्या विवरणपत्रात विहीत कालमर्यादेत म्हणजे **दि. ०१/०३/२०१७ पूर्वी न चुकता पाठवावी**. यामध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यांची माहिती